संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# आता चारशे दहशतवाद्यांचा खात्मा हवा

**भारताच्या** इतिहासातील सर्वात भीषण आत्मघातकी हल्ला झाला आहे. एकाच हल्ल्यात जवानांची इतक्या मोठ्या संख्येने किंमत मोजण्याची वेळ भारतावर पहिल्यांदाच आली. आणि म्हणून हुतात्मा झालेल्या जवानांच्या बलिदानाला व्यर्थ जाऊ देता येणार नाही. या हल्ल्याने भारतातील प्रत्येक नागरिकाच्या मनामध्ये एक खोल जखम केली आहे. जोपर्यंत या संख्येच्या पाचपट दहशतवादी मारले जात नाहीत. तोपर्यंत या जखमेची वेदना कायम राहील. हा केवळ बेचाळीस जवानांवरचा हल्ला ठरत नाही. तो कोट्यवधी भारतीयांच्या स्वाभिमानाला त्यांच्या भारतीयत्वाला डिवचणारा हल्ला आहे. यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे नेहमीचे रडगाणे ऐकून भारतीयांनाही कंटाळा आला आहे. आता जसा हल्ला तसे उत्तर. ज्यांनी केला त्यांचाच खात्मा अशा पध्दतीने हल्ल्याचे प्रत्युत्तर द्यावे लागेल. मुठभर दहशतवादी एवढ्या मोठ्या लष्कराच्या किंवा भारतासारख्या बलदंड देशाच्या नाकात दम आणतात. ही गोष्ट भारताच्या पुरुषार्थालाच मिळालेले सर्वात मोठे आव्हान आहे. जैश ए मोहम्मद या अतिरेकी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्याचा व्हिडीओ हल्ल्यानंतर सात मिनिटामध्ये व्हायरल होतो तोसुध्दा तेलंगणातून व्हायरल झाल्याची माहिती पुढे आली आहे. याचा अर्थ हल्लेखोर आणि त्यांना मदत करणाऱ्या गद्दारांना पहिल्यांदा वेचून काढले पाहिजे. आणि त्याचपध्दतीने ठेचून मारलेही पाहिजे. हा हल्ला करून जैश ए मोहम्मदने सर्जिकल स्ट्राईकचा बदला घेतल्याची चर्चा आहे. तर ज्या काश्मिरमधल्या तरुणांची माथी भडकावून हा हल्ला केला गेला त्या जैश ए मोहम्मदची आता कायमसाठी कबर खोदली गेली पाहिजे. जवानांचे बलिदान व्यर्थ दिले जाऊ देणार नाही. असा इशारा पंतप्रधानांनी दिला असला तरी बेचाळीस जणांचे प्राण आपण वाचवू शकलो नाही याबद्दल शरमेने मान खाली जाते. उरूसारख्या चित्रपटातून आपण आपल्या लष्कराच्या सामर्थ्याचा गौरव केला परंतु अशा चित्रपटातून नको ते संदेशही गेले आणि काश्मिरमधल्या माथी भडकलेले तरुण जी संधी शोधत होते त्यांनी ती एवढ्या मोठ्या लष्कराला गुंगारा देऊन साधली आहे. हा हल्ला देशाच्या एकूणच संरक्षण व्यवस्थेच्या चिंधड्या उडवणारा ठरतो.

### तालिबान संपू शकता जैश ए मोहम्मद का नाही ?

हल्ल्यामागे पाकिस्तान असल्याची तक्रार ही कितीही खरी असली तरी जर त्याला आपण रोखू शकत नसू तर त्यात आपलीच सर्वात मोठी चूक ठरते. अफजल गुरुला दिली गेलेली फाशी त्यामुळे काश्मिरी तरुणांमध्ये असलेला संताप पाकिस्तानकडून या वातावरणाचा घेतला जाणारा गैरफायदा तो ओळखण्यात आणि रोखण्यात आपल्याकडून होत असलेली गंभीर चूक या गोष्टीदेखील आपण स्वीकारल्या पाहिजेत. भविष्यकाळात असे हल्ले तर सोडाच परंतु काश्मिरमधल्या एकाही व्यक्तीला कुठल्याच अर्थाने असुरक्षित वाटणार नाही. आणि तो दहशतवाद्यांच्या हातातले बाहुले होणार नाही याची दीर्घकालीन उपाययोजना करावी लागेल. ही दीर्घकालीन योजना एकाचवेळी अनेक आघाड्यांवर कार्यरत ठेवली आणि पुढची काही वर्षे मिशन काश्मिर असा अजेंडा नक्की करून तिथल्या नागरिकांना दिली जाणारी वेगळेपणाची वागणूक किंबहुना संपूर्ण काश्मिरला दिले गेलेले ३७० चे कवच काढून घेण्यापर्यंत मोजके पण ठोस प्रयत्न करावे लागतील. एखादा प्रदेश पन्नास वर्षे दहशतीचा बळी ठरतो याचा अर्थ त्या प्रांताला दिली गेलेली वेगळी वागणुक लायकीपेक्षा जास्त गेलेले स्वातंत्र्य, पात्रतेपेक्षा जास्त दिला गेलेला पैसा किंवा दिले गेलेले अनाठायी राजकीय महत्व तातडीने कमी केले पाहिजे. सतत काश्मिरच्या वेगळेपणाचे भांडवल तिथल्या राजकारण्यांनी आणि फुटीरतावाद्यांनी केले. आपले महत्व टिकवून ठेवण्याकरीता आणि काश्मिरवर आपलीच सत्ता आणि दहशत राहाण्याकरीता त्यांनी सर्व प्रकारचे मार्ग अवलंबिले. पाकिस्तानच्या पैशावर पोसल्या गेलेल्या प्रवृत्तीला दहशतीची चटक लागली आणि मग काश्मिरी पंडितांना हुसकावून लावण्यापासून ते आता लष्करालाही भंडावून सोडण्यापर्यंत कटकारस्थाने चालू आहेत. या सगळ्या समस्येचे मूळ काश्मिरला दिलेल्या वेगळेपणात आहे हे लक्षात घेतलेपाहिजे. पाकिस्तानला दोष देण्यापूर्वी किंवा पाकिस्तान दहशतवाद्यांना देत असलेल्या आश्रयापूर्वी काश्मिरमधल्या गद्दारांचा बंदोबस्त केला पाहिजे.कारण ज्या पाकिस्तानच्या मदतीवर त्यांनी हा दहशतवाद माजवला आहे. त्यांना सर्वप्रथम वठणीवर आणले पाहिजे.

### निषेध करण्याचे दिवस संपले

अमेरिकेने अफगाणिस्तानमधल्या तालिबानला वठणीवर आणले. इराकमधला हुकुमशाही दहशतवाद संपवला.श्रीलंकेने तामिळ ईलमची मागणी करणाऱ्यांना ठेचून काढले. एवढेच नव्हे तर अफगाणिस्तानमध्ये दहशतवाद संपावा आणि तिथे लोकशाही प्रक्रिया सुरु व्हावी म्हणून भारतानेदेखील मदत केली. पण भारतालाच आपल्याच राज्यातला दहशतवाद निपटून काढता येऊ नये हा धक्कादायक प्रकार ठरतो. अनेकवेळेला काश्मिर समस्येचे उत्तर लष्करी कारवाईत नाही ते राजकीय मार्गाने सोडवले पाहिजे अशी बांग दिली जाते. पण ती सर्वस्वी स्वार्थीच आहे. काश्मिर समस्या ही लष्करी मार्गानेच सोडवली पाहिजे. अफगाणिस्तानात सलग काही वर्षे अमेरिकन सैन्य ठाण मांडून बसले तेव्हा आज तिथली परिस्थिती काही प्रमाणात सुधारली आहे. इराकचीसुध्दा खोड मोडली गेली आहे. भारतानेदेखील काश्मिरचे सर्व व्यवस्थापन लष्कराच्या हातात सोपवावे. कारण केंद्र सरकारचा अब्जावधीचा पैसा खाऊन आणि पाकिस्तानचे गुलाम बनून काम करणाऱ्या तिथल्या माजलेल्या राजकारण्यांची आणि फुटीरतावाद्यांची मस्ती कमी केली तर काश्मिरची समस्या ही समस्याच राहाणार नाही. आता हल्ल्यांचे निषेध करण्याचे किंवा त्या हल्ल्यांना भेकड ठरवून प्रतिक्रिया देण्याचे दिवस संपलेले आहेत. सर्व प्रकारची मुत्सद्दी, राजकीय, लष्करी, कौशल्य पणाला लावून पुढच्या पाच वर्षात मिशन काश्मिर असे ध्येय गाठले पाहिजे. एकेक जवानांचा बळी लाखमोलाचा असतो. यापुढे तो जाणार नाही. दहशतवाद्यांसकट पाकिस्तानला आपण कोणती घोडचूक केली हे पुढची पाचशे वर्षे लक्षात राहील अशी आक्रमकता किंवा मुत्सद्दीपणा दाखवला तरच भारताने आपला पुरुषार्थ जागवला असे म्हणता येईल.